वितरण आदेश क्रमांक: ८
कोषागारातून रोख रक्कम देय अनुदान
सन २०२५-२०२६

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रशासक कार्यरत असल्यामुळे ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी रोखून ठेवला होता त्यापैकी ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूका होऊन लोकनियुक्त प्रतिनिधींची नियुक्ती झाली आहे अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा सन २०२३-२४ चा पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा अबंधित निधी रू. १८५.३२५२ कोटी वितरीत करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२५/प्र.क्र.९२/वित्त-४

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
दिनांक : २३ मार्च, २०२६

**वाचा :**

१. शासन परिपत्रक क्रमांकः पिईएस-२३२०/प्र.क्र.२२/ आसक, ग्राविवि.दि.२८/०४/२०२०
२. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५९ /वित्त-४,ग्रा.वि.वि.दि.२६/०६/२०२०
३. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ५९ /वित्त-४,ग्रा.वि.वि.दि.०४/१२/२०२०
४. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२३/प्र.क्र. ७४ /वित्त-४, ग्रा.वि.वि.दि.१३/१२/२०२३
५. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२३/प्र.क्र. ७४ /वित्त-४, ग्रा.वि.वि.दि.०४/०३/२०२४
६. वित्त मंत्रालय, भारत सरकार पत्र **क्रमांक F.8(4)/FCD/2025-26(RLB Release No.89/ 2025-26) दिनांक २०.०३.२०२६**

**प्रस्तावना :**

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रशासक कार्यरत असल्यामुळे ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी रोखून ठेवला होता त्यापैकी ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूका होऊन लोकनियुक्त प्रतिनिधींची नियुक्ती झाली आहे अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा सन २०२३-२४ चा पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा अबंधित निधी रू. १८५.३२५२ कोटी वितरीत केला असल्याचे वित्त

मंत्रालय, भारत सरकार यांच्या संदर्भ क्र.६ येथील आदेशान्वये कळविले आहे. त्यानुसार १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाकडून राज्य शासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :

वित्त मंत्रालय, व्यय विभाग, वित्त आयोग यांच्या दि. १४.७.२०२१ च्या पत्रासोबतच्या मार्गदर्शक सूचना 5 (A) (ii) नुसार जर ग्रामीण स्थानिक संस्थांची रीतसर स्थापना केली असेल तर ग्रामीण स्थानिक संस्था अनुदान देण्यास पात्र असल्याचे मानले जाईल. तसेच राज्यांना अनुदान फक्त रीतसर स्थापना (Duly Constituted) केलेल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रो रेटा आधारावर दिले जाईल असे कळविले आहे.

२. सन २०२३-२४ मध्ये प्रशासक कार्यरत असलेल्या ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना अबंधित निधीचा पहिला व दुसरा हप्ता वितरित करण्यात आलेला नाही. ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुका होऊन लोकप्रतिनिधींची नियुक्ती झालेली आहे, अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुपये १८५.३२५२ कोटीची मागणी पंचायतराज मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे करण्यात आली होती. संदर्भ क्रमांक ६ अन्वये राज्यास निधी वितरित करण्यात आलेला आहे. ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सदर निधीचे वितरण करण्यात येणार आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे

| ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थां | पहिला हप्ता | दुसरा हप्ता |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | १२ | १२ |
| पंचायत समिती | १२५ | १२५ |
| ग्रामपंचायत | ११२० | १८३ |

३. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी सन २०२३-२४ चा अबंधित निधीचा प्रशासक कार्यरत असल्यामुळे रोखून ठेवलेला पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा निधी रुपये १८५.३२५२ कोटी वितरण सोबतच्या विवरणपत्रात (प्रपत्र- अ ) दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना (जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांसाठी) अनुक्रमे लेखाशीर्षाखाली (२५१५२६२८ / २५१५२६४६ / २५१५२६६४) वितरित करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांना निधी वितरीत करण्यासाठी विवरणपत्र (प्रपत्र - अ) नुसार निधी अर्थसंकल्पीय

वितरण प्रणालीव्दारे (बीम्सवर) वितरीत करण्यात येत आहे. तसेच जिल्हा परिषदांना ग्रामविकास विभागामार्फत निधीचे वितरण (प्रपत्र- अ) नुसार केले जाईल. सदर निधी पंचायत राज संस्थाना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांमध्ये अनुक्रमे १०:१०:८० या प्रमाणात वितरीत करण्यात येत आहे.

४. सर्व जिल्हा परिषदांनी e-Gramswaraj-PFMS-Treasury Net यांच्या इंटीग्रेशनने कोषागारात देयक सादर करुन पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या बँक खात्यात १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा निधी जमा करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषदेचा निधी ग्रामविकास विभागामार्फत e-Gramswaraj-PFMS Treasury Net यांच्या इंटीग्रेशनने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे देयक सादर करुन जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात निधी जमा करणे आवश्यक आहे.

५. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची राहील. सदर शासन निर्णयातील संदर्भ क्र. १, २ व ३ मधील कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

६. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार अबंधित निधीचा (Untied Grants) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजेनुसार (Location Specific felt needs) आवश्यक बाबींवर वापर करावा. तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, सदर अनुदानाचा वापर राज्य शासनाने मंजूर केलेल्या बाह्य संस्थांकडून करण्यात येणाऱ्या लेखा परिक्षणासाठी करू शकतात.

७. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करू नये व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करू नये. तसेच केंद्रिय वित्त आयोग आणि पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि.१४.७.२०२१ आणि दि. ११.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार सदर निधीतून दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यत किमान ५० टक्के खर्च होणे आवश्यक आहे. ५०% खर्च झाल्याशिवाय केंद्रीय वित्त आयोगाकडून पुढील हप्त्याचे वितरण केले जाणार नाही. खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यावर राहील. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरांवर दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यत किमान ५०% खर्च करणे आवश्यक आहे.

८. या शासन निर्णयान्वये सन २०२३-२४ च्या अबंधित निधीचे वितरण १२ जिल्हा परिषद, १२५ पंचायत समिती आणि ग्रामपंचायती (पहिला हप्ता ११२० ग्रामपंचायती आणि दुसरा हप्ता १८३ ग्रामपंचायती) यांना करण्यात येणार आहे. सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिवशीच

जिल्हानिहाय निधी बीम्सप्रणालीवर वितरीत करण्यात येणार आहे. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन कोषागारात देयके सादर करुन तीनच कार्यालयीन दिवसात हा निधी पंचायत समिती आणि ग्रामपंचायती यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. जिल्हा परिषदांचा निधी ग्रामविकास विभागाकडुन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. निधी वितरणास विलंब झाल्यास दंडणीय व्याजाची संपुर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

९. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरासाठी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतंर्गत आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अबंधित निधीच्या (Untied Grants) रोखून ठेवलेल्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्यापोटी राज्यास प्राप्त निधीच्या वितरणासाठी होणारा खर्च खालील ३ लेखाशिर्षांखाली करण्यात आलेल्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकावा.

१. मागणी क्रमांक-एल-३, २५१५ - इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००), १९६ - जिल्हा परिषदांना/जिल्हा स्तरीय पंचायतींना सहाय्य (००), (००) (१०) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार जिल्हापरिषदांना/जिल्हास्तरीय पंचायतींना विविध विकास योजनांसाठी सहाय्य अनुदाने, (मुलभूत/बेसिकग्रँट) (२५१५२६२८), ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू. ७०.३२२६ कोटी) (रूपये सत्तर कोटी बत्तीस लाख सव्वीस हजार)

२. मागणी क्रमांक-एल-३, २५१५ - इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००), १९७-पंचायत समितीना सहाय्य, (००), (००) (०३) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत समितीना सहाय्य अनुदाने, (मुलभूत/बेसिकग्रँट) (२५१५२६४६), ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू. ७०.३२२६ कोटी) (रूपये सत्तर कोटी बत्तीस लाख सव्वीस हजार)

३. मागणी क्रमांक-एल-३,२५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००), १९८-ग्रामपंचायतींना सहाय्य (००),(००) (११) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना सहाय्य अनुदाने, (मुलभूत/बेसिकग्रँट) (२५१५२६६४), ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू. ४४.६८ कोटी) (चव्वेचाळीस कोटी अडूसष्ट लाख)

१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) वर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०३२३१२१५५३०३२० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANOJKUMAR SHRENIK SHETE

Digitally signed by MANOJKUMAR SHRENIK SHETE
DN: c=IN, postalCode=410206, st=MAHARASHTRA, street=302 KOHINOOR COMPLEX ,PLOT NUMBER 25 ,RAIGARH,SECTOR NUMBER 21 KAMOTHE ,410206, l=RAIGARH, o=Personal, serialNumber=2b8a6046860edec9b80f99e591a5fd9e1197cbf3ebadcd9c91ac6fff44440f57, pseudonym=f48e52aab0bb428e8499636dd00bb412, 2.5.4.20=fb747e637e0a121446d3119c732a784dd0fe7a1e26457765f83c306f61f287e8, email=MANOJKUMARSHRENIKSHETE@GMAIL.COM, cn=MANOJKUMAR SHRENIK SHETE
Date: 2026.03.23 13:17:36 +05'30'

**(डॉ. मनोजकुमार शेटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत - प्रपत्र - अ**

प्रत.

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे सचिव
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
७. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधान परिषद
८. मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१०.मा.प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
११.महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
१४.सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
१५.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१६. सर्व उपसचिव / अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१९. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२०.सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
२१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२.वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प१७- / वित्त आयोग कक्ष.)
२३.ग्राम विकास विभाग ( सर्व कार्यासने )
२४.निवड नस्ती का.वित्त-४, ग्राम विकास विभाग, मुंबई १.

# प्रपत्र- अ

## अबंधित निधी

## सन २०२३-२४

## वितरण आदेश क्र. ८ क्रमांक. पविआ-२०२५/प्र.क्र.९२/वित्त-४ दि. २३ मार्च, २०२६ चे विवरणपत्र

(रक्कम रूपयांत)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद लेखाशिर्ष २५१५२६२८ | | | पंचायत समितीचे नाव | पंचायत समिती लेखाशिर्ष २५१५२६४६ | | | ग्रामपंचायत लेखाशिर्ष २५१५२६६४ | | | | | एकूण रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ला हप्ता | २ रा हप्ता | एकूण रू.(अ) | | १ ला हप्ता | २ रा हप्ता | एकूण रू. (ब) | एकूण ग्रा.पं. पहिला हप्ता | १ ला हप्ता रू. (क) | एकूण ग्रा.पं. दुसरा हप्ता | २ रा हप्ता रू. (ड) | एकूण रू. (इ) = (क+ड) | (अ) +(ब) +(इ) |
| १ | रायगड | २५८२०६२२ | २५८५१२१० | **५१६७१८३२** | अलिबाग | ३०१५२०९ | ३०१८८४९ | **६०३४०५८** | | | | | | |
| २ | | | | | पेण | २२४९७६७ | २२५२४६० | **४५०२२२७** | | | | | | |
| ३ | | | | | पनवेल | ३३४११४७ | ३३४५१९० | **६६८६३३७** | | | | | | |
| ४ | | | | | उरण | १७७८३२० | १७८०४३० | **३५५८७५०** | | | | | | |
| ५ | | | | | कर्जत | २६०२२०५ | २६०५३३४ | **५२०७५३९** | | | | | | |
| ६ | | | | | खालापूर | १८७३०४६ | १८७५२७३ | **३७४८३१९** | | | | | | |
| ७ | | | | | सुधागड पाली | ८००८२० | ८०१७२१ | **१६०२५४१** | | | | | | |
| ८ | | | | | रोहा | २३२९२८३ | २३३२०७४ | **४६६१३५७** | | | | | | |
| ९ | | | | | मुरुड | ९०३३३४ | ९०४३६१ | **१८०७६९५** | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | | | | | तळा | ५२०६०८ | ५२११६२ | **१०४१७७०** | | | | | | |
| ११ | | | | | माणगांव | २०७५५६४ | २०७८०४१ | **४१५३६०५** | | | | | | |
| १२ | | | | | महाड | १९४२०७५ | १९४४३८७ | **३८८६४६२** | | | | | | |
| १३ | | | | | म्हसळा | ७६४६१० | ७६५४६५ | **१५३००७५** | | | | | | |
| १४ | | | | | श्रीवर्धन | ९८२२५० | ९८३३७५ | **१९६५६२५** | | | | | | |
| १५ | | | | | पोलादपूर | ६४२३८४ | ६४३०८८ | **१२८५४७२** | | | | | | |
| | **एकूण** | **२५८२०६२२** | **२५८५१२१०** | **५१६७१८३२** | **एकूण** | **२५८२०६२२** | **२५८५१२१०** | **५१६७१८३२** | | | | | | **१०३३४३६६४** |
| १६ | रत्नागिरी | २१०१८५४८ | २१०४३७३६ | ४२०६२२८४ | मंडणगड | ९०६२४० | ९०७२७१ | **१८१३५११** | | | | | | |
| १७ | | | | | दापोली | २४३६१७८ | २४३९१०१ | **४८७५२७९** | | | | | | |
| १८ | | | | | खेड | २४६०३८७ | २४६३३४० | **४९२३७२७** | | | | | | |
| १९ | | | | | चिपळूण | ३३३१०१८ | ३३३५०४८ | **६६६६०६६** | | | | | | |
| २० | | | | | गुहागर | १७४१७२७ | १७४३७९२ | **३४८५५१९** | | | | | | |
| २१ | | | | | संगमेश्वर | २७६५८१२ | २७६९१४३ | **५५३४९५५** | | | | | | |
| २२ | | | | | रत्नागिरी | ३५१९०४९ | ३५२३३१२ | **७०४२३६१** | | | | | | |
| २३ | | | | | लांजा | १४०३७८४ | १४०५४३० | **२८०९२१४** | | | | | | |
| २४ | | | | | राजापूर | २४५४३५३ | २४५७२९९ | **४९११६५२** | | | | | | |
| | **एकूण** | **२१०१८५४८** | **२१०४३७३६** | **४२०६२२८४** | **एकूण** | **२१०१८५४८** | **२१०४३७३६** | **४२०६२२८४** | | | | | | **८४१२४५६८** |
| २५ | सिंधुदुर्ग | ११४६२७३९ | ११४७६३०७ | २२९३९०४६ | दोडामार्ग | ७७१५५४ | ७७२५२८ | **१५४४०८२** | ४ | ४०७००० | – | | | |
| २६ | | | | | सावंतवाडी | १९१७३०६ | १९१९५८८ | **३८३६८९४** | | | | | | |
| २७ | | | | | वेंगुर्ला | १०६६०६९ | १०६७२९८ | **२१३३३६७** | | | | | | |
| २८ | | | | | कुडाळ | २०९०५५७ | २०९३०५३ | **४१८३६१०** | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | | | | | मालवण | १४३३४९५ | १४३५१७८ | **२८६८६७३** | | | | | |
| ३० | | | | | कणकवली | १८४३११३ | १८४५३०३ | **३६८८४१६** | | | | | |
| ३१ | | | | | देवगड | १६४२४२८ | १६४४३६९ | **३२८६७९७** | | | | | |
| ३२ | | | | | वैभववाडी | ६९८२१७ | ६९८९९० | **१३९७२०७** | | | | | |
| | **एकूण** | **११४६२७३९** | **११४७६३०७** | **२२९३९०४६** | **एकूण** | **११४६२७३९** | **११४७६३०७** | **२२९३९०४६** | | **४०७०००** | | | **४०७०००** | **४६२८५०९२** |
| ३३ | पुणे | ४९४०७७८४ | ४९४६८१८६ | ९८८७५९७० | आंबेगाव | ३१७१२८४ | ३१७५११७ | **६३४६४०१** | १७० | ४९०७३००० | - | - | | |
| ३४ | | | | | बारामती | ४३८६१२४ | ४३९१४६० | **८७७७५८४** | | | | | | |
| ३५ | | | | | भोर | २५०२६३० | २५०५६१३ | **५००८२४३** | | | | | | |
| ३६ | | | | | दौंड | ४७७८६३६ | ४७८४४५७ | **९५६३०९३** | | | | | | |
| ३७ | | | | | हवेली | ३६८९९८० | ३६९४४५५ | **७३८४४३५** | | | | | | |
| ३८ | | | | | इंदापूर | ५४१५००० | ५४२२०४० | **१०८३७०४०** | | | | | | |
| ३९ | | | | | जुन्नर | ५४५८००० | ५४६४७०५ | **१०९२२७०५** | | | | | | |
| ४० | | | | | खेड | ५२२२६०२ | ५२२८९७३ | **१०४५१५७५** | | | | | | |
| ४१ | | | | | मावळ | ३६५२३०९ | ३६५६७३७ | **७३०९०४६** | | | | | | |
| ४२ | | | | | मुळशी | २२१०९६१ | २२१३६०६ | **४४२४५६७** | | | | | | |
| ४३ | | | | | पुरंदर | २८८६२६४ | २८८९७४५ | **५७७६००९** | | | | | | |
| ४४ | | | | | शिरुर | ५१४८९१० | ५१५५१८९ | **१०३०४०९९** | | | | | | |
| ४५ | | | | | वेल्हा | ८८५०८४ | ८८६०८९ | **१७७११७३** | | | | | | |
| | **एकूण** | **४९४०७७८४** | **४९४६८१८६** | **९८८७५९७०** | **एकूण** | **४९४०७७८४** | **४९४६८१८६** | **९८८७५९७०** | | **४९०७३०००** | | | **४९०७३०००** | **२४६८२४९४०** |
| ४६ | सातारा | ३६११२८०० | ३६१५६४९४ | ७२२६९२९४ | जावळी (मेढा) | १५३३९४७ | १५३५७५४ | **३०६९७०१** | १०२ | १४६३०००० | - | - | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४७ | | | | | वाई | २४२८७०६ | २४३१६२० | **४८६०३२६** | | | | | |
| ४८ | | | | | सातारा | ४४९५१७५ | ४५००६४५ | **८९९५८२०** | | | | | |
| ४९ | | | | | फलटण | ४३०३४८३ | ४३०८७१६ | **८६१२१९९** | | | | | |
| ५० | | | | | महाबळेश्वर | ७४२९२७ | ७४३७५६ | **१४८६६८३** | | | | | |
| ५१ | | | | | माण | २९२१४४० | २९२४९६४ | **५८४६४०४** | | | | | |
| ५२ | | | | | कोरेगांव | ३२२७०११ | ३२३०९१३ | **६४५७९२४** | | | | | |
| ५३ | | | | | खटाव | ३८७२३८८ | ३८७७०८८ | **७७४९४७६** | | | | | |
| ५४ | | | | | खंडाळा | १६५७६७२ | १६५९६३३ | **३३१७३०५** | | | | | |
| ५५ | | | | | कराड | ६७१६८१८ | ६७२५०५१ | **१३४४१८६९** | | | | | |
| ५६ | | | | | पाटण | ४२१३२३३ | ४२१८३५४ | **८४३१५८७** | | | | | |
| | **एकूण** | **३६११२८००** | **३६१५६४९४** | **७२२६९२९४** | **एकूण** | **३६११२८००** | **३६१५६४९४** | **७२२६९२९४** | | **१४६३००००** | | | **१४६३००००** | **१५९१६८५८८** |
| ५७ | सांगली | २९१४६५२५ | २९१८१६८० | ५८३२८२०५ | आटपाडी | १७८६८७३ | १७८८९९४ | **३५७५८६७** | ६१ | १४४८१००० | - | - | | |
| ५८ | | | | | जत | ४५९३२८७ | ४५९८८७९ | **९१९२१६६** | | | | | |
| ५९ | | | | | कडेगाव | १९२४४२३ | १९२६७१३ | **३८५११३६** | | | | | |
| ६० | | | | | कवठे-महांकाळ | २०८५८६२ | २०८८३५२ | **४१७४२१४** | | | | | |
| ६१ | | | | | विटा | १७५६७८८ | १७५८८७१ | **३५१५६५९** | | | | | |
| ६२ | | | | | मिरज | ४९६१९०८ | ४९६७९५६ | **९९२९८६४** | | | | | |
| ६३ | | | | | पलूस | १९३०३२१ | १९३२६१९ | **३८६२९४०** | | | | | |
| ६४ | | | | | शिराळा | २११७२१८ | २११९७४७ | **४२३६९६५** | | | | | |
| ६५ | | | | | तासगांव | ३०९४७२४ | ३०९८४६२ | **६१९३१८६** | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६६ | | | | | वाळवा | ४८९५१२१ | ४९०१०८७ | **९७९६२०८** | | | | | | |
| | **एकूण** | **२९१४६५२५** | **२९१८१६८०** | **५८३२८२०५** | **एकूण** | **२९१४६५२५** | **२९१८१६८०** | **५८३२८२०५** | | **१४४८१०००** | | | **१४४८१०००** | **१३११३७४१०** |
| ६७ | सोलापूर | ४१९४७०१२ | ४१९९७९०७ | ८३९४४९१९ | अक्कलकोट | ३७०६२९१ | ३७१०७८५ | **७४१७०७६** | ८० | ३६६०७००० | १ | ५२९००० | | |
| ६८ | | | | | बार्शी | ३५४२७३१ | ३५४७०२३ | **७०८९७५४** | | | | | | |
| ६९ | | | | | करमाळा | ३५९४७७८ | ३५९९१३४ | **७१९३९१२** | | | | | | |
| ७० | | | | | माढा | ४३३९२५५ | ४३४४५३२ | **८६८३७८७** | | | | | | |
| ७१ | | | | | माळशिरस | ५५४१६१५ | ५५४८३८० | **११०८९९९५** | | | | | | |
| ७२ | | | | | मोहोळ | ३५२६५४३ | ३५३०८१६ | **७०५७३५९** | | | | | | |
| ७३ | | | | | मंगळवेढा | २८९३५५१ | २८९७०४० | **५७९०५९१** | | | | | | |
| ७४ | | | | | उत्तर सोलापूर | १८९२५२६ | १८९४७७७ | **३७८७३०३** | | | | | | |
| ७५ | | | | | पंढरपूर | ४८०६१४३ | ४८११९९८ | **९६१८१४१** | | | | | | |
| ७६ | | | | | सांगोला | ४२४५७२५ | ४२५०८८६ | **८४९६६११** | | | | | | |
| ७७ | | | | | दक्षिण सोलापूर | ३८५७८५४ | ३८६२५३६ | **७७२०३९०** | | | | | | |
| | **एकूण** | **४१९४७०१२** | **४१९९७९०७** | **८३९४४९१९** | **एकूण** | **४१९४७०१२** | **४१९९७९०७** | **८३९४४९१९** | | **३६६०७०००** | | **५२९०००** | **३७१३६०००** | **२०५०२५८३८** |
| ७८ | कोल्हापूर | ३९०४२९३० | ३९०९०१४५ | ७८१३३०७५ | करवीर | ६६९२२२४ | ६७००४१२ | **१३३९२६३६** | १६ | ५१०२००० | - | - | | |
| ७९ | | | | | गडहिंग्लज | २७१५५०४ | २७१८७७३ | **५४३४२७७** | | | | | | |
| ८० | | | | | राधानगरी | २९००३८७ | २९०३८८५ | **५८०४२७२** | | | | | | |
| ८१ | | | | | चंदगड | २६५८५८२ | २६६१७८० | **५३२०३६२** | | | | | | |
| ८२ | | | | | पन्हाळा | ३५९३१३६ | ३५९७४९१ | **७१९०६२७** | | | | | | |
| ८३ | | | | | भुदरगड | २२००९२२ | २२०३५५५ | **४४०४४७७** | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८४ | | | | | शाहूवाडी | २७३७६९४ | २७४०९९० | **५४७८६८४** | | | | | | |
| ८५ | | | | | आजरा | १५३४०३३ | १५३५८४१ | **३०६९८७४** | | | | | | |
| ८६ | | | | | गगनबावडा | ५८५०४९ | ५८५६८२ | **११७०७३१** | | | | | | |
| ८७ | | | | | शिरोळ | ४०२७५५४ | ४०३२४४६ | **८०६००००** | | | | | | |
| ८८ | | | | | कागल | ३२२९८६४ | ३२३३७६९ | **६४६३६३३** | | | | | | |
| ८९ | | | | | हातकणंगले | ६१६७९८१ | ६१७५५२१ | **१२३४३५०२** | | | | | | |
| | **एकूण** | **३९०४२९३०** | **३९०९०१४५** | **७८१३३०७५** | **एकूण** | **३९०४२९३०** | **३९०९०१४५** | **७८१३३०७५** | | **५१०२०००** | | | **५१०२०००** | **१६१३६८१५०** |
| ९० | छत्रपती संभाजीनगर | ३२६३१३९२ | ३२६७०९४७ | ६५३०२३३९ | छत्रपती संभाजीनगर | ४८९९१३२ | ४९०५१०२ | **९८०४२३४** | १२ | २५०२००० | - | - | | |
| ९१ | | | | | पैठण | ४५२७३०८ | ४५३२८१८ | **९०६०१२६** | | | | | | |
| ९२ | | | | | गंगापूर | ४७७१२१३ | ४७७७०२५ | **९५४८२३८** | | | | | | |
| ९३ | | | | | वैजापूर | ४१२९२३६ | ४१३४२५४ | **८२६३४९०** | | | | | | |
| ९४ | | | | | कन्नड | ४५६२३६८ | ४५६७९२२ | **९१३०२९०** | | | | | | |
| ९५ | | | | | खुल्ताबाद | १५१३३१९ | १५१५१०१ | **३०२८४२०** | | | | | | |
| ९६ | | | | | सिल्लोड | ४३९६८५९ | ४४०२२०८ | **८७९९०६७** | | | | | | |
| ९७ | | | | | फुलंब्री | २२१००४० | २२१२६८४ | **४४२२७२४** | | | | | | |
| ९८ | | | | | सोयगांव | १६२१९१७ | १६२३८३३ | **३२४५७५०** | | | | | | |
| | **एकूण** | **३२६३१३९२** | **३२६७०९४७** | **६५३०२३३९** | **एकूण** | **३२६३१३९२** | **३२६७०९४७** | **६५३०२३३९** | | **२५०२०००** | | | **२५०२०००** | **१३३१०६६७८** |
| ९९ | परभणी | १८६१०८०७ | १८६३३०१९ | ३७२४३८२६ | सेलू | १८४६४३३ | १८४८६२७ | **३६९५०६०** | १ | २३७००० | - | - | | |
| १०० | | | | | जिंतूर | ३५६४१७२ | ३५६८४९१ | **७१३२६६३** | | | | | | |
| १०१ | | | | | परभणी | ३४२००१४ | ३४२४१५४ | **६८४४१६८** | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०२ | | | | | मानवत | १२७८२२० | १२७९७१२ | **२५५७९३२** | | | | | | |
| १०३ | | | | | पाथरी | १५२८३७९ | १५३०१७९ | **३०५८५५८** | | | | | | |
| १०४ | | | | | सोनपेठ | ११००१५९ | ११०१४३० | **२२०१५८९** | | | | | | |
| १०५ | | | | | गंगाखेड | २२४६९६३ | २२४९६५३ | **४४९६६१६** | | | | | | |
| १०६ | | | | | पालम | १४८५५३० | १४८७२७७ | **२९७२८०७** | | | | | | |
| १०७ | | | | | पूर्णा | २१४०९३७ | २१४३४९६ | **४२८४४३३** | | | | | | |
| | **एकूण** | **१८६१०८०७** | **१८६३३०१९** | **३७२४३८२६** | **एकूण** | **१८६१०८०७** | **१८६३३०१९** | **३७२४३८२६** | | **२३७०००** | | | **२३७०००** | **७४७२४६५२** |
| १०८ | धाराशिव | २०२४७६६२ | २०२७१९८८ | ४०५१९६५० | धाराशिव | ४३९४६६८ | ४४०००१४ | **८७९४६८२** | १ | ४५८००० | - | - | | |
| १०९ | | | | | तुळजापूर | ३४८०९१७ | ३४८५१३३ | **६९६६०५०** | | | | | | |
| ११० | | | | | उमरगा | ३०९२६३९ | ३०९६३७४ | **६१८९०१३** | | | | | | |
| १११ | | | | | लोहारा | १५९१९१३ | १५९३७९२ | **३१८५७०५** | | | | | | |
| ११२ | | | | | कळंब | २८४६१३२ | २८४९५६३ | **५६९५६९५** | | | | | | |
| ११३ | | | | | वाशी | ११५८७३५ | ११६००७८ | **२३१८८१३** | | | | | | |
| ११४ | | | | | भूम | १७९८४४५ | १८००५८० | **३५९९०२५** | | | | | | |
| ११५ | | | | | परंडा | १८८४२१३ | १८८६४५४ | **३७७०६६७** | | | | | | |
| | **एकूण** | **२०२४७६६२** | **२०२७१९८८** | **४०५१९६५०** | **एकूण** | **२०२४७६६२** | **२०२७१९८८** | **४०५१९६५०** | | **४५८०००** | | | **४५८०००** | **८१४९७३००** |
| ११६ | लातूर | २५९५२१७९ | २५९८३३८१ | ५१९३५५६० | अहमदपूर | २७९४४९७ | २७९७८६४ | **५५९२३६१** | ६ | १३७६००० | - | - | | |
| ११७ | | | | | औसा | ४०२८५३१ | ४०३३४२४ | **८०६१९५५** | | | | | | |
| ११८ | | | | | चाकूर | २३११६८३ | २३१४४५२ | **४६२६१३५** | | | | | | |
| ११९ | | | | | देवणी | १२५१३६२ | १२५२८१९ | **२५०४१८१** | | | | | | |
| १२० | | | | | जळकोट | ११५१७१८ | ११५३०५३ | **२३०४७७१** | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२१ | | | | | लातूर | ४३४९८९३ | ४३५५१८४ | **८७०५०७७** | | | | | | |
| १२२ | | | | | निलंगा | ४१५५१९० | ४१६०२४० | **८३१५४३०** | | | | | | |
| १२३ | | | | | रेणापूर | १८१९३९१ | १८२१५५२ | **३६४०९४३** | | | | | | |
| १२४ | | | | | शिरूर अनंतपाळ | १०७७९८६ | १०७९२२९ | **२१५७२१५** | | | | | | |
| १२५ | | | | | उदगीर | ३०११९२८ | ३०१५५६४ | **६०२७४९२** | | | | | | |
| | **एकूण** | **२५९५२१७९** | **२५९८३३८१** | **५१९३५५६०** | **एकूण** | **२५९५२१७९** | **२५९८३३८१** | **५१९३५५६०** | | **१३७६०००** | | | **१३७६०००** | **१०५२४७१२०** |
| | ठाणे | | | | | | | | ५५ | १६५३५००० | | | १६५३५००० | १६५३५००० |
| | पालघर | | | | | | | | ४९ | ३४८६०००० | | | ३४८६०००० | ३४८६०००० |
| | जळगाव | | | | | | | | १६६ | ५४२९८००० | १६६ | ८१९१६००० | १३६२१४००० | १३६२१४००० |
| | नाशिक | | | | | | | | ६ | १४४६००० | ४ | १६४५००० | ३०९१००० | ३०९१००० |
| | अहिल्यानगर | | | | | | | | ८१ | ४४३६३००० | | | ४४३६३००० | ४४३६३००० |
| | बीड | | | | | | | | १२६ | ३७१२६००० | | | ३७१२६००० | ३७१२६००० |
| | नांदेड | | | | | | | | १३ | २१०४००० | २ | ४४५००० | २५४९००० | २५४९००० |
| | अमरावती | | | | | | | | २० | ४८७७००० | | | ४८७७००० | ४८७७००० |
| | बुलढाणा | | | | | | | | ४८ | १६४५३००० | | | १६४५३००० | १६४५३००० |
| | वाशिम | | | | | | | | २ | ३३२००० | १ | २३७००० | ५६९००० | ५६९००० |
| | यवतमाळ | | | | | | | | ७ | ८४२००० | ४ | ११९८००० | २०४०००० | २०४०००० |
| | भंडारा | | | | | | | | ६३ | १५४२६००० | | | १५४२६००० | १५४२६००० |
| | नागपूर | | | | | | | | १ | २०९००० | | | २०९००० | २०९००० |
| | वर्धा | | | | | | | | ८ | ९३०००० | १ | ९३००० | १०२३००० | १०२३००० |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | चंद्रपूर | | | | | | | | | | १ | ५४८००० | ५४८००० | ५४८००० |
| | गडचिरोली | | | | | | | | २२ | ४५२६००० | ३ | ९८९००० | ५५१५००० | ५५१५००० |
| | | | | | | | एकुण | | | | | | | १८५३२५२००० |

MANOJKUMAR SHRENIK SHETE

Digitally signed by MANOJKUMAR SHRENIK SHETE
DN: c=IN, postalCode=410206, st=MAHARASHTRA, street=302 KOHINOOR COMPLEX ,PLOT NUMBER 25 ,RAIGARH,SECTOR NUMBER 21 KAMOTHE ,410206, l=RAIGARH, o=Personal, serialNumber=2b8a6046860edec9b80f99e591a5fd9e1197cbf3ebadcd9c91ac6fff44440f57, pseudonym=f48e52aab0bb428e8499636dd00bb412, 2.5.4.20=fb747e637e0a121446d3119c732a784dd0fe7a1e26457765f83c306f61f287e8, email=MANOJKUMARSHRENIKSHETE@GMAIL.COM, cn=MANOJKUMAR SHRENIK SHETE
Date: 2026.03.23 13:18:14 +05'30'

(डॉ. मनोजकुमार शेटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन